



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २८०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२२ मे २०२५


## थोडक्यात

### जिल्ह्याला अवकाळीचा तडाखा... मदतीसाठी तातडीने अहवाल सादर करा



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२१, धाराशिव :** एप्रिल व मे महिन्यात जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती, फळबागा, घरे, जनावरे व इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यातील विविध भागांत वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे पाठवावा अशा सूचना आमदार पाटील यांनी यावेळी केली.

वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने धाराशिव तालुक्यातील महादेव माळी या शेतकऱ्याच्या काढणीस आलेल्या टमाट्याच्या बागेचे मोठे नुकसान झाले आहे.याचप्रमाणे जिल्ह्यातील अनेक भागात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. याशिवाय अनेक भागांत घरांची पडझड झाली असून, जनावरांचे मृत्यू, वीजपुरवठा खंडित होणे, शेती पाण्याखाली जाणे आदी गंभीर प्रकार समोर आले आहेत.

या पार्श्वभूमीवर 'मित्र' चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जिल्हाधिकारी धाराशिव यांच्याकडे नुकसानग्रस्तांची तातडीने दखल घेऊन महसूल व कृषी विभागामार्फत पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी शासनाकडे वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली आहे.

### अखेरचा फोन मुलीला, कुटुंबासहित गाव चिंतातूर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील मेहरा बुद्रुक येथे एक विचित्र घटना समोर आली आहे. मुलाच्या लग्नाच्या वाढदिवसासाठी संभाजीनगर येथे निघालेले वडील मुलाच्या घरी पोहचू शकले नाहित. वडिलांचा शोध घेतला असता ते कुठेही मिळून आले नाही ही घटना आटोळ या गावातील आहे.

अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेळगाव आटोळ येथील रहिवाशी असलेल्या शकुंतला श्रीराम सुरडकर वय वर्ष ४५ यांनी पोलीस स्टेशनला त्याबाबत तक्रार दिली आहे. त्यांना दोन मुले आणि एक मुलगी आहेत. यामध्ये लहान मुलगा किरण याचे लग्न झाल्याने तो व त्याची पत्नी शीतल दोघेही छत्रपती संभाजीनगर येथे राहतात. व मुलगी पूजा हिचे आठ दिवसांपूर्वीच लग्न झाले होते. ती गजानन नगर चिखली येथे राहते. यामध्ये बेपत्ता झालेले श्रीराम किसन सुरडकर वय वर्ष ५० राहणार शेलगाव आटोळ हे शेतमजुरीचे काम करून उदरनिर्वाह करतात. मुलाच्या वाढदिवसाकरिता ते छत्रपती संभाजीनगर येथे भेटून येतो असे सांगून घरातून निघून गेले. अद्यापही ते छत्रपती संभाजीनगर येथे न पोचल्याने सर्वजण चिंताग्रस्त झाले. घरून निघताना ते बहिणीचा मुलगा सुमेध सुभाष चव्हाण वय वर्ष १७ याला सोबत घेऊन गेले होते. मात्र सुमेध व त्याची पत्नी हे चिखली येथील बस स्टँडवरच उतरले. परंतु बेपत्ता झालेले श्रीराम अद्यापही घरी परतले नाहीत. त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकडे देखील शोध घेण्यात आला असून अद्याप ते कुठे सापडले नाहीत. याबाबत त्यांची उंची पाच फूट पाच इंच, यामध्ये त्यांचा रंग सावळा व अंगात पांढऱ्या रंगाचे कपडे अशा वर्णाचा त्यांचा उल्लेख करून जवळपासच्या पोलिस स्टेशनला देखील याची सूचना देण्यात आली आहे.

दरम्यान, मुलाच्या लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने घरातून निघालेले बेपत्ता झालेले श्रीराम अद्याप न सापडल्याने संपूर्ण परिवारासह त्यांचा मित्रपरिवार व गावात देखील एकच चिंता व्यक्त केली जात आहे. त्यांचा शेवटचा संवाद त्यांची मुलगी पुजा हिच्याशी झाला. त्यामुळे पोलिस त्यांच्यात शेवटचे काय बोलणे झाले? याचा शोध घेत आहेत.

### ऑनलाइन गेमचं व्यसन ठरलं जीवघेणं !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, नागपूर :** स्मार्टफोनवर खेळल्या जाणाऱ्या ऑनलाइन गेम्सचं वाढतं व्यसन आणि त्यातून उद्भवणाऱ्या आर्थिक अडचणींचा भीषण परिणाम पुन्हा एकदा समोर आला आहे. नागपूर शहरातील कामठी परिसरात राहणाऱ्या एका २५ वर्षीय युवकाने आर्थिक ताणतणावामुळे आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ऑनलाइन गेम्सच्या आहारी गेलेल्या अनिकेत गणेश ढबाळे या युवकाने विषारी पदार्थ प्राशन करून जीवन संपवलं. अनिकेत हा आयटीआयमध्ये फिटर ट्रेडचा विद्यार्थी होता. शिक्षणासोबतच तो कामठी शहरातील एका नामांकित बेकरीमध्ये काम करत होता. त्याला मोबाईलवर खेळल्या जाणाऱ्या ऑनलाइन गेम्सचं प्रचंड आकर्षण होतं. सुरुवातीला वेळ घालवण्यासाठी म्हणून खेळणारा अनिकेत हळूहळू गेमच्या आहारी गेला आणि त्याचं व्यसनात रूपांतर झालं.

**लहान रक्कमेची गुंतवणूक अन् वाढत गेलेले कर्ज**

खेळांमध्ये जिंकण्यासाठी त्याने ऑनलाइन पेमेंटद्वारे पैसे लावायला सुरुवात केली. सुरुवातीला लहान रक्कम असलेली ही गुंतवणूक हळूहळू मोठ्या कर्जात बदलली. काही गेम्समध्ये हरल्याने त्याच्यावर कर्जाचा बोजा वाढत गेला. आर्थिक ताणतणावामुळे अनिकेत मानसिकरित्या खचला होता. घरच्यांशी तो फारसा बोलत नव्हता आणि सतत गप्प राहायचा, अशी माहिती त्याच्या नातेवाईकांनी दिली. १५ मे रोजी अनिकेतने आपल्या राहत्या घरी विषारी उंदीरनाशक प्राशन केले. कुटुंबीयांनी वेळीच लक्ष दिल्यामुळे त्याला तातडीने नागपूरमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, पाच दिवसांनंतर म्हणजेच २० मे रोजी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## गुंगीचं ड्रिंक पाजून भावी डॉक्टर तरुणीवर सामूहिक अत्याचार



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२१, सांगली :**

सांगलीत महाराष्ट्राला कामिळा फासणारी घटना घडली आहे. सांगली शहरातील एका मेडिकल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या भावी डॉक्टर तरुणीला गुंगीकारक ड्रिंक पाजून तिघांनी सामूहिक अत्याचार केला. मंगळवारी रात्री वानलेसवाडी येथे राहणाऱ्या तिच्या मित्राच्या खोलीत ही घटना घडली. याची माहिती मिळताच विश्रामबाग पोलिसांनी तातडीने हालचाली करत तीन तरुणांना अटक केली आहे. यातील दोघे पीडित तरुणीच्या कॉलेजमध्येच शिकत असून तिसरा संशयित तरुण त्यांचा मित्र आहे.

**चित्रपट पाहायला जाऊ असे सांगितले अन...**

विनय विश्वेष पाटील (यय २२, रा. महीपती निवास अंतरोळीकर नगर भाग १ सोलापुर शहर), सर्वज्ञ संतोष गायकवाड (वय२०, रा. एफ ६०५, सरगम नांदेड सिटी सिंहगड रोड पुणे), तन्मय सुकुमार पेडणेकर (वय २१, रा. ३०३ कासाली व्हिया अभयनगर, सांगली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पीडित तरुणी आणि संशयित पाटील, गायकवाड सांगलीतील एकाच मेडिकल कॉलेजमध्ये शिकत आहेत. पीडित तरुणी तिसऱ्या वर्षात शिकत आहेत. मंगळवारी रात्री या तिघांनी तिला चित्रपट पाहायला जाऊ असे सांगून मोपेडवरून वानलेसवाडी येथील खोलीवर नेले.

**गुंगीकारक ड्रिंक पाजले आणि...**

रुमवर गेल्यानंतर त्यांनी तरुणीला गुंगीकारक ड्रिंक पाजले तसेच तेही दारू प्यायले. त्यानंतर तरुणी नशेत असताना तिघांनी तिच्यावर अत्याचार केले. काही वेळाने तरुणी शुद्धीत आल्यानंतर तिने तेथून स्वतःची सुटका करून घेतली त्यानंतर मध्यरात्री थेट विश्रामबाग पोलीस ठाणे गाठले. त्यावेळी अपर पोलीस अधीक्षक रितू खोकर, विश्रामबागचे निरीक्षक सुधीर भालेराव यांनी तिची तक्रार ऐकून गुन्हा नोंद करून तातडीने संशयितांना अटक करण्याच्या सूचना दिल्या.

**पोलिसांनी संशयितांना केली अटक...**


विश्रामबाग पोलिसांनी अवघ्या काही तासात तीनही संशयितांना अटक केली.विश्रामबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुधीर भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली बिरोबा नरळे, प्रशांत माळी, आर्यन देशिंगकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोलिसांकडून या धक्कादायक प्रकरणाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

## वादळ वारा, पाऊस धारा ; नागरिकांनो नका घेऊ, होर्डिंगचा सहारा...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, पनवेल :** सध्याच्या पावसाळी वातावरणात वादळी वारा पाऊस असेल तर अशा परिस्थितीमध्ये मोठमोठ्या जाहिरात फलकाखाली किंवा होर्डिंग जवळ उभे राहू नका, असे आवाहन पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी सर्व नागरीकांना केले आहे.

महानगरपालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी, विविध आकाराचे आणि उंचीचे जाहिरात फलक उभारण्यात आलेले आहेत. अनपेक्षितपणे मान्सुनपूर्व वादळ, वाऱ्यामुळे असे जाहिरात फलक पडू शकतात.



यावर खबरदारीचे उपाय म्हणून महापालिकेने यापूर्वीच सर्व जाहिरातदारांना मान्सुनपूर्व कालावधीत सर्व जाहिरात फलकांची प्रत्यक्ष जागेवर जावून तपासणी करणे, त्याचे फाऊंडेशन व्यवस्थित असल्याचे तसेच जाहिरात फलकांच्या लोखंडी सांगाड्यास गंज लागला नसल्याची खात्री करणे, त्यास गंजरोधक रंग लावणे. एखादा जाहिरात फलक धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यास तो तात्काळ निष्कासित करणे, त्यासोबतच जाहिरात फलक वादळ, वारा यामुळे पडणार नाही, यासाठीच्या सर्व उपाययोजना कराव्यात अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरीकांनी मान्सून कालावधीत अशा जाहिरात फलकाच्या खाली अथवा जाहिरात फलकाच्या आसपास थांबण्याचे टाळावे अथवा आपली वाहने लावू नयेत अथवा टपरी, हातगाडी, पत्राशेड लावून कोणी व्यवसाय करीत असल्यास ते ताबडतोब काढून घ्यावे. जेणेकरुन जीवित अथवा वित्तीय हानी होणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे आवाहन परवाना विभागाचे उप आयुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी केले आहे.

## अंमली पदार्थ दुष्परिणामाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करा : जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, चंद्रपूर :** अंमली पदार्थाचे सेवन म्हणजे मृत्युला आमंत्रण आहे. आजची युवा पिढी या सेवनाच्या आहारी जाऊ नये, यासाठी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे मानवी जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत लोकांमध्ये जनजागृती करा.



तसेच जिल्ह्यात अंमली पदार्थाची वाहतुक, साठवणूक आणि विक्री प्रतिबंधासाठी संबंधित यंत्रणांनी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात नार्को–कोऑर्डिनेशन समितीच्या जिल्हास्तरीय बैठकीत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी मिना साळूंके, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक, केंद्रीय जीएसटी विभागाचे अधीक्षक विजयकुमार, पोलीस निरीक्षक अमोल काचोरे, प्रदिप मडावी आदी उपस्थित होते.

शाळा– महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थ्यांकडून अंमली पदार्थ, दारु, तंबाखूचे सेवन होणार नाही, याकडे विशेष लक्ष द्यावे, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, अंमली पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत शिक्षण विभागाने मॅरेथॉन रॅली, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पथनाट्य व इतर माध्यमातून जनजागृती करावी. पोलीस विभागाच्या सहकार्याने शाळा–महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित कराव्या. यासाठी वर्षभराचे नियोजन करावे. अन्न व औषध प्रशासन विभागाने जिल्ह्यात असलेल्या रासायनिक कारखान्यांमध्ये कोणत्याही प्रकारच्या अंमली पदार्थाचे उत्पादन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच मेडिकल स्टोअर्सला अचानक भेटी देऊन प्रतिबंधित ड्रग्ज विक्री होत आहे की कसे, याची तपासणी करावी.

जिल्ह्यात तसेच आंतरराज्य सीमेवरील शेतीमध्ये खसखस किंवा गांजा पिकाची लागवड होणार नाही, याबाबत शेतकऱ्यांना अवगत करावे. सोबतच ग्रामस्तरावरील कृषी अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात यावी. टपालद्वारे येणाऱ्या पार्सलमध्ये काही अंमली पदार्थाबाबत संशय आला तर तात्काळ पोलिसांना कळवावे. खाजगी वाहनांद्वारे येणारी टपाल, पार्सल, कुरीयर आकस्मिकपणे तपासावे. एमआयडीसी परिसरात किती कारखाने आहेत, तेथे प्रतिबंधित उत्पादन होते काय, तसेच बंद असलेल्या कारखान्यांची संयुक्तरित्या तपासणी करावी, आदी सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या. बैठकीचे सादरीकरण पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांनी केले.

## उस्मानाबाद रेल्वे स्थानकाचे नाव बदलून 'धाराशिव' करण्यास यश - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२१, धाराशिव :** महाराष्ट्र शासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार उस्मानाबाद या रेल्वे स्थानकाचे नाव बदलून धाराशिव असे करण्यास केंद्र सरकारकडून पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे. गृह मंत्रालयाच्या दिनांक २ डिसेंबर २०२४ च्या पत्रानुसार, या नाव बदलाच्या प्रस्तावावर भारतीय सर्वेक्षण विभागाची टिप्पणी मागवण्यात आली होती.



यानंतर देखील उस्मानाबाद रेल्वे स्थानकाचे धाराशिव असे नामांतर करण्याबाबत संथ गतीने प्रक्रिया सुरू होती. या अनुषंगाने खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी सह बैठक घेऊन सदर स्थानकाचे नाव धाराशिव असे नामांतरित करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत सूचित केले होते तसेच केंद्रीय रेल्वे मंत्री मा.ना.श्री. अश्विनी वैष्णव यांच्याकडून पत्राव्दारे पाठपुरावा केला होता. त्यानुसार केंद्र शासनाने उस्मानाबाद रेल्वे स्थानकाचे नामांतर धाराशिव असे करण्यास मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे धाराशिव या प्राचीन ऐतिहासिक शहराला पारंपरिक ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, स्थानिक नागरिकांमध्ये या निर्णयाचे स्वागत होत आहे.




## दहशतवाद वैश्विक समस्या

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ मध्ये तामिळनाडू मधील श्रीपेराम्बदूर येथे एल टी टी ई ( लिट्टे ) च्या दहशतवाद्यांनी एका प्रचारसभेत बॉम्बस्फोट करून हत्या केली. राजीव गांधी यांच्या हत्येने संपूर्ण देश हादरुन गेला. १९८४ साली माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली त्यानंतर भारताला बसलेला हा दुसरा हादरा होता. हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर होता. या हल्ल्याने भारतच नव्हे तर संपूर्ण विश्वच दहशतवाद्यांच्या दहशतीखाली आले. २१ मे १९९१ पासून सुरू झालेला दहशतवाद्यांचा हा धुमाकूळ आजही जगभरात सुरू आहे म्हणूनच २१ मे हा राजीव गांधी यांचा स्मृतिदिन संपूर्ण जगात दहशतवादी विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. सद्य स्थितीत जगभरात वेगवेगळ्या प्रकारचा दहशतवाद पसरला आहे. दहशतवादाने संपूर्ण जग व्यापले आहे. जगातील एकही देश आज दहशतवादापासून मुक्त नाही. दहशतवाद आज सर्व देशांचे दार ठोठावीत आहे. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्तेला देखील दहशतवादाचा तडाखा बसला आहे. दहशतवादी हा शब्द उच्चारायला जरी वेगळा वाटत असला तरी याचे नेतृत्व करणारे लोक हे अशिक्षित नसून उच्चशिक्षित असतात. देव व धर्माच्या नावाखाली तरुणांचे ब्रेन वाशिंग करुन हे लोक श्धयेच्या नावाखाली जगभरात दहशतवाद पसरवीत आहेत. दहशतवाद म्हणजे लोकशाहीच्या विरोधातील बाजू त्यामुळे दहशतवाद हा लोकशाही शासनव्यसवस्थेत अडथळे निर्माण करतो. सामाजिक असंतुलन हे दहशतवादाचे मूळ आहे. सत्तेची हाव, अधिकार नाकारणे, स्वतः च्या फायद्यासाठी दुसऱ्याला ओलीस धरणे, धर्मसत्ता लादणे, जाती भिन्नता, धर्मभेद तसेच समाजातील भिन्न संस्कृतीचे लोक एकमेकांबरोबर आणि एकाच राजकीय छत्राखाली व एकाच न्यायव्यवस्थेखाली राहायला नाखूष असतात. बरेचदा राज्यकर्त्यांचे एखाद्या भागाकडे दुर्लक्ष होते व त्या भागाची प्रगती खुंटते त्यामुळे एकाच देशात आर्थिक भेदभाव निर्माण हातात आणि त्यातून आतंकवादाचा जन्म होतो. आपण सर्वांनी जागरूक होणे आवश्यक आहे. दहशतवाद हा मानवजातीचा शत्रू आहे. यामुळे संभाव्य धोक्याची जाणीव ठेवून प्रतिकारासाठी सज्ज असले पाहिजे. जागतिक दहशतवादाचा सगळ्यात मोठा हादरा भारताला बसला आहे, त्यामुळे दहशतवाद नष्ट करणे ही देशातील प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारताला बसली आहे. दहशतवादाने भारताला दोन कर्तव्यदक्ष पंतप्रधानांना गमवावे लागले आहे. अगदी सर्वसामान्य नागरिकांपासून पंतप्रधानांपर्यंत सर्वांनाच दहशतवाद्यांनी लक्ष केले आहे. गेल्या पन्नास वर्षापासून भारत दहशतवादाचा झळा सोसतोय त्यात देशातील लाखो निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे आजही जात आहे. २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांना ठार केले त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात संतापाची लाट उसळली. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवून त्याचा बदला घेतला मात्र तरीही दहशतवादी त्यातून धडा घेतील असे वाटत नाही. ते दहशतवाद पसरवतच राहतील. दहशतवाद संपवण्याची जबाबदारी केवळ सरकारची, सुरक्षा यंत्रणेची किंवा लष्कराची नाही तर देशातील प्रत्येक नागरिकांची आहे. देशातील नागरिकांनीही नेहमी सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. आपल्या आसपास कोठेही काही संशयास्पद आढळले तर नागरिकांनी त्यांची माहिती सुरक्षा यंत्रणांना द्यावी. सुरक्षा यंत्रणेइतकेच नागरिकांनीही सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. दहशतवादाची झळ जशी भारताला बसली आहे तशीच ती जगालाही बसली आहे. दहशतवादाने केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जग पोळले आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, जपान, दक्षिण कोरिया, रशिया, इस्राईल, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका या जगातील बलाढ्य देशांनाही दहशतवाद्यांनी तडाखा दिला आहे. केवळ बलाढ्य देशच नव्हे तर जगातील सर्वच लहान मोठ्या देशांना दहशतवादाची झळ बसत आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करणे ही कोणा एका देशाची नाही तर जगातील सर्व देशांची जबाबदारी आहे. दहशतवादाची समस्या ही वैश्विक आहे म्हणून दहशतवादाशी लढायचे असेल तर संपूर्ण जगाला एक व्हावेच लागेल त्यासाठी अमेरिका, रशिया सारख्या महासत्ता असलेल्या देशांनी दुटप्पी भूमिका न घेता दहशतवादा विरुद्ध युद्ध पुकारावे. दहशतवादी हे मानवतेचे शत्रू आहे. त्यामुळे संपूर्ण जगानेच एक होऊन या मानवतेच्या शत्रूंचा मुकाबला करायला हवा.


# मित्र वनव्यामधे गारव्यासारखा

मित्राशिवाय जीवन अशक्यच होय. मित्र किती आहेत,यापेक्षा कोणते आहेत, याला महत्त्व असतं. जिवाभावाचे मित्र प्रत्येकाला मिळत असतात. अशा मित्रांमुळेच तर जीवन समृद्ध होतं आणि जीवन जगण्याची खरी मजा अनुभवता येते. वेगवेगळ्या स्वभाववैशिष्ट्यांचे मित्र आपल्या सोबत असतील, तर प्रत्येकाकडून नवनवीन गोष्टी शिकता येतात. धैर्य, आत्मविश्वास आणि सुख-दुःखात साथ देणारे फक्त मित्रच असतात.

असे अनेक मित्र मला आयुष्यात मिळत गेले आणि त्यामुळेच माझं जीवन अधिक समृद्ध होत गेलं. मागील आठवड्यात माझ्या १९९६ च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा पार पडला. मी एकाच वेळी अनेक मित्रांना भेटलो. आज जीवनात मागे वळून पाहताना, बालपणापासून आजपर्यंतचे एकेक मित्र डोळ्यासमोर उभे राहतात.

सर्व मित्रांमधून प्रकर्षाने ज्याची उणीव आजही भासते, तो म्हणजे आम्हा सर्वांना सोडून गेलेला आमचा मित्र राहुल नागणे. फार कमी वयात त्याने या जगाचा निरोप घेतला. सौम्य स्वभावाचा आणि प्रत्येकावर जीव लावणारा राहुल मैत्रीच्या दुनियेतील एक राजा माणूस होता. आम्ही दोघं मिळून शाळेत जायचो ; आणि एकत्रच घरी परतायचो. एकत्र अभ्यास करायचो, खूप गप्पा मारायचो आणि भविष्याची अनेक स्वप्ने रंगवायचो. त्याची साथ आज नसली, तरी त्याच्या अनेक आठवणी मी उराशी जपून ठेवल्या आहेत.

विजय गुंड असाच एक माझा आक्रमक



- किशोर जाधव, सोलापूर
- मो. नं. ९९२२८८२५४१

आणि तितकाच प्रेमळ मित्र. आज तो शिक्षक भारती संघटनेचा प्रवक्त आहे. अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड त्याच्या मनात आणि बोलण्यातून सतत प्रकट होते. खरंतर आम्ही एकमेकांशी खूप वाद घालतो, भांडणं करतो. आजही आमच्यात अनेक विषयांवर मतभेद आहेत, पण मनभेद कधीच होणार नाहीत याची आम्ही दोघेही दक्षता घेतो. चित्रकार, कर्तव्यदक्ष शिक्षक, गायक, शिक्षक नेता अशा अनेक भूमिका एकाच वेळी बजावताना त्याच्याकडे पाहून मला खरोखरच अभिमान वाटतो. तो नेहमी म्हणतो, खरंच आपण वेडे आहोत! एखाद्या गोष्टीचा ध्यास लागणे, याला तो वेडेपणा समजतो. शिक्षकांच्या प्रश्नांवर निस्वार्थीपणे भांडणारा,आपल्या घरादाराची चिंता न करणारा आणि प्रत्येक गोष्टीत झोकून देऊन काम करणारा माझा हा मित्र खरोखरच वेडा आहे, असं कधी कधी मलाही वाटतं.

उल्हास भोसले – त्याच्या नावातच उल्हास भरलेला आहे. त्याच्या पालकांना त्याचे गुण कदाचित आधीच जाणवले असतील. उल्हासला भेटल्यावर, त्याच्याशी बोलल्यावर आणि त्याच्याबद्दल दुसऱ्यांशी बोलताना सुद्धा मनात उल्हास निर्माण होतो. असा हा स्वतःसह दुसऱ्यांनाही उल्हासित करणारा माझा मित्र म्हणजे समोरच्याचा झटक्यात मूड चेंज करणारा जादूगारच आहे. असं म्हणतात, माणसाचं जीवन क्षणभंगुर असतं. आज आहे, तर उद्या नाही. मग अशा या अशाश्वत जीवनात धीरगंभीर होऊन किती वेळ जगायचं? आणि धीरगंभीर होण्याने सगळे प्रश्न सुटतात का? याचं उत्तर – 'कधीच नाही!' म्हणूनच उल्हाससारखे हर फिक्र को धुएँ में उडाता चला गया! म्हणणारे, सतत हास्यविनोद करणारे मित्र असावेत. उल्हासचा टीकाटिप्पणी करत साऱ्यांना हसवण्याचा हातखंडा अनेकांना आवडतो. हसण्यासाठीच आपण जन्म घेतलाय! असंच त्याच्या जवळ गेल्यावर वाटत राहतं . आजच्या काळात माणसाच्या चेहऱ्यावरचं आणि जीवनातलं हास्य हरवलेलं आहे. स्मित हास्य किंवा खोटं हास्य याला काही अर्थ नाही. बत्तीस दात दिसेपर्यंत हसलं तरच ते आरोग्यासाठी आणि मानसिक स्वास्थ्यासाठी उपयुक्त ठरतं. उल्हाससारखा मित्र म्हणजेच प्रकृती ठीक ठेवणारा डॉक्टरच होय.

शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाल्यानंतर शिवशंकर माने नावाच्या एका सोज्वळ व सुस्वभावी शिक्षक मित्राचा सहवास मला लाभला. ते माझ्यापेक्षा दहा वर्षांनी ज्येष्ठ आहेत. सायकलवरून शाळेत येणे आणि शाळा सुटल्यानंतर त्यांच्यासोबत गप्पा मारत घरी जाणे – यामुळे त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची मला ओळख झाली.

किताबे पढ़ने से ज्ञान नहीं मिलता, मंदिर जाने से भगवान नहीं मिलता!

लोक पत्थर इसलिए पूजते हैं, की विश्वास के लायक इंसान नहीं मिलता!

अशा काळात, कोणावर विश्वास ठेवावा आणि किती ठेवावा, हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात येतो. हातचं राखून मैत्री केली जाते. पण माने सरांनी नेहमी निखळ मैत्री जपली. सर माझ्यासाठी एक मित्र, गुरु, स्फूर्तिदाते आणि शुभचिंतक म्हणून कायम पाठीशी राहिले.

माझ्या वैयक्तिक जीवनात बिघडण्याचे, चुकीच्या मार्गाला लागण्याचे अनेक प्रसंग आले. परंतु अशा काळात त्यांनी मला सावरलं. पुस्तकांशी मैत्री जोडून दिली. नवनवीन लेखकांच्या पुस्तकांची ओळख करून दिली. कॉलेज जीवनात परिश्रमपूर्वक बनवलेला हस्तलिखितांचा खजिना माझ्यासाठी खुला केला. वाचनाचं वेड लावलं, लिखाणाला प्रोत्साहन दिलं. कोणतीही हाव, अपेक्षा किंवा कोणाशी स्पर्धा न करता जीवन जगावं, हा गुण मी त्यांच्या ठिकाणी पाहिला आणि तो आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. कोणालाही उपदेशाचे डोस न पाजता स्वतःचं आचरण योग्य ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न मला नेहमी प्रेरणा देतो.

असे अनेक मित्र प्रत्येकाला मिळत असतात. वनव्यामधील गारव्यासारखे मित्र हीच खरी संपत्ती असते.

## धारावीतील वाल्मिकी नगर मंडल अध्यक्षपदी मनिषा खंदारे



**अक्षराज : प्रतिनिधी दि.२१, मुंबई :** भारतीय जनता पार्टी धारावी विधानसभेच्या मंडल अध्यक्षाच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या.

भाजपा मुंबई अध्यक्ष आ.ॲड.आशिष शेलार यांनी या नियुक्त्या जाहीर केल्या असून धारावीतील वाल्मिकी नगर मंडल अध्यक्षपदी मनिषा खंदारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच काळा किल्ला मंडल अध्यक्षपदी अरुण जैसवाल तर कुंभारवाडा -कांबादेवी नगर मंडल अध्यक्षपदी रमेश एन नाडार यांची नियुक्ती केली असून त्याचा या निवडीने विविध क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

## जोहार...

दहशतवादी तळावर
अचूकास्त्र करे प्रहार
शांतीदूतकपोतभारत
अवकाशी करे विहार

डोळेवटाळू पाहे शत्रू
चुकवे तत्क्षणी उधार
आश्रया येताचं दुर्बळ
पंखाखाली दे आधार

धमकीइशारा पोकळ
नाही लेचापेचानिर्धार
घिसाड घाई मान्य ना
निर्णायक तो संप्रधार

आत्मप्रौढी मुळी नसे
शस्त्रसज्जजरीआगार
प्रशिक्षीत सैन्य कुशल
भरलेगच्च किमयागार

तृतीयनेत्र उघडी शिव
उद्रेक करतो न्याहार
जवांनांनी तिरंग्याला
दिलाअप्रतिमउपहार

अचूक मार ब्रह्मोसचा
लक्ष्यवेध वेळेत संहार
आम जनता सुरक्षित
शत्रूंची झटक्यात हार

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# २१व्या शतकातही अंधश्रध्दा आजार बळावतो!

श्रध्दा माणसाला मानसिक सामर्थ्य देते, तर अंधश्रध्दा माणसाला हतबल करते. श्रध्दा आत्मविश्वास वाढवते, तर अंधश्धद्धा असहाय करते. श्रध्दा आणि अंधश्रध्दा यांच्यात एक धूसर सीमा रेषा असते. ही रेषा कधी ओलांडली जाईल आणि श्रध्दा अंधश्धद्धेत कधी रुपांतर होईल सांगता येत नाही. बऱ्याच वेळा आपल्याला असे वाटते, अज्ञानता, अशिक्षितपणा, गरीबी यामुळे अंधश्रध्दा वाढते. पण हल्लीच्या काळात सुशिक्षित, सधन कुटूंबातील व्यक्ती सुध्दा बाबा-बुवांच्या, माताजीच्या मागे जातांना दिसतात. इथे तोच मुद्दा उपस्थित होतो, तो म्हणजे कोणत्या व्यक्तीवर श्रध्दा असावी किंवा नसावी हा ज्याचा त्याचा वैयक्तितीक प्रश्न आहे. मात्र त्या व्यक्तीवर पूर्णपणे विश्वास टाकून आंधळेपणाने विसंबून राहणे ही मात्र अंधश्धद्धा आहे. एखादे कर्मकांड तर्काला पटत नाही म्हणून ते करु नये असे बुध्दिला वाटते. पण परंपरेने चालत आल्यामुळे ते केलेच पाहिजे असा भावनेचा हट्ट असतो. अशी तर्कविहीत मानसिकता म्हणजे श्रध्दा! श्धद्धा आणि अंधश्धद्धा यात तत्वत: भेद नाही. पण ज्या श्धद्धेपायी माणसाची लक्षणीय प्रमाणात आर्थिक हानी होत त्या श्रध्देला अंधश्रध्दा म्हणता येईल.

आदिवासी समाज, ग्रामीण भाग, शहरी भाग, उच्च शिक्षित, उच्च मध्यम वर्गीय, अति श्रीमंत अशा कुठल्याही वर्गातील माणूस असून त्याच्या काही श्रध्दा समजूती असतात. अंधश्रध्दा ही सर्वात जास्त आदिवासी समाजात आणि इत्रत्र पाहायला मिळते तसा विचार केला तर या आदिवासी समाजात प्रचंड गरीबी, अज्ञान, शिक्षणाचा अभाव, मुख्य म्हणजे गरीबीपेक्षाही दैनंदिन गरजाच ज्यांच्या पुर्ण होत नाही, त्यांना तुम्ही शिक्षण काय देणार? सतत आर्थिक गर्तेत असणारा हा समाज अंधश्रध्देत पार गुरुफुटून गेलेला आपल्याला आढळून येईल. आदिवासींच्या वसाहतीत गेल्यावर काही गोष्टी माझ्या लक्षात आल्या की, या समाजात एक समज आहे तो म्हणजे बाळ जन्माला आल्यावर त्याला लगेच आईचं दूध द्यायचं नाही. खरं तर हेच त्यांच्या मुलांच्या कुपोषणाच कारण नाही काय? अशा वेळी इथे भक्ताचं प्राबल्य अधिक पाहायला मिळते.

वर्धा रोडवरील आदिवासी कॉलोनी मध्ये एक घटना पाहायला मिळाली. एका घरात एका बाईने बाळाला जन्म दिले तेंव्हा तिला खुप रक्त प्रवाह झाला. तिची सासू यावर उपाय म्हणून भगताने दिलेली विभूती लावत होती. तेंव्हा मित्रांनी डॉक्टर आणले. डॉक्टरांनी तपासल्यावर ग्लूकोज द्यायला सांगितले. सासूने विरोध सुरु केला. पोटात काही द्यायच नाही असे भगताने सांगितले, फक्त विभूती लावायची. मग मात्र मी त्या सासूला व बाळाच्या वडीलांना समजवण्याचा प्रयत्न केला. उद्या आईला काही झालं, तर तू दुसरं लग्न करशील, पण बाळाचा विचार कर. त्याला आई नको कां? खूप विणवण्या केल्यानंतर कुठे ते तयार झाले. शेवटी तिला दवाखाण्यात दाखल करुन सलाईन लावले. दोन-तीन दिवसांनी ती खणखणीत घरी येवून चूली जवळ भाकरी थापतांना दिसली. तेव्हा दोन जीव वाचवण्याचं समाधान मिळाले. यांच्या मध्ये आपणांस मद्य प्राशन करणे, जनावरांचा बळी देणे, मुलींची लहान वयात लग्न करणे या प्रथा आजही प्रामुख्याने पाहायला मिळतात. पण त्यांच्यात आपल्या पेक्षा माणूसकी जास्त आहे. आणि बलात्काराच प्रमाणही जवळ-जवळ शून्यच आहे. म्हणजे आदिवासी पुरुषानच आदिवासी महिलेवर बलात्कार केला अशी घटना ऐकीवात नाही. कारण ते बहुतांशी निसर्गाच्या सानिध्यात खुलेपणाने वाढत असतात. त्यामूळे शारिरिक आकर्षणाचा भाग कमी असतो.

आदिवासी समाजाला बघायचं झाल्यास (त्यात त्यांचे संस्कार) ग्रामीण भाग, खेडी, गाव, अशा भागात आपण नजर टाकली तर एखादा भोंदू बाबा त्यांचे चमत्कार, अंगारे, ताईत, गंडे-दोरे या ठिकाणी त्यांचीच चलती असते. लिंबू मिर्ची आणि उलट्या टांगलेल्या काळ्या बाहुल्यांचा तर बड प्रस्थ



– संकलन व सुलेखन –
प्रभाकर सोमकुवर
नागपूर
मो.९५९५२५५९५२

अनेक गावांमध्ये महिलांवर बरीच बंधन असतात. छोटया-छोट्या समजूती अंधश्रध्दा आहेतच. स्त्रियांनी मासिक धर्म पाळायचा तीन दिवस वेगळे राहायचं. स्वयंपाक घरात पाऊल टाकायच नाही, कुठल्याही वस्तूला हात लावायच नाही, आपल्या भांड्यामध्येच जेवायचं, कुणावरही सावली पडू देता कामा नये याची काळजी घ्यावी. अशा कितीतरी समजूती आजच्या काळातही असल्याचा आपल्याला दिसून येते. ही मानसिकता दिलली गेली पाहिजे. विज्ञानयुगात आपण वाटचाल करीत आहोत यांचे भान ठेवावं अन् जुन्या रुढीला मुठमाती द्यावी.

शहरी भागाकडे आपण वळलो आणि मध्यमवर्गीय कुटूंबामध्ये आपण डोकावलो तर लक्षात येईल की, अंधश्रध्देने इथेही आपले हात-पाय पसरलेले आहेत. एक गोष्ट खरी की, माणूस कशावरही श्रध्दा ठेवून आपलं चांगलं व्हावं ही प्रार्थना करीत असतो. एखादी अज्ञात शक्ती असते जिला तुम्ही देव म्हणा नाहीतर काहीही म्हणा, फक्त त्याच्या आहारी जाऊ नका. माणुस अशा गोष्टींकडे केव्हा वळतो याचं अगदी बरोबर वर्णन कवि मंगेश पाडगांवकरांनी केलं आहे. ते म्हणतात 'माणसे खपाट खंगलेली, अदृश्य दहशतीने तंगलेली'. अशा माणसांना आधार हवा असतो. सर्व उपाय करुन थकल्यावर माणुस कुठेतरी विश्वास ठेवतो. त्यावेळी कुणीतरी एखाद्या बाबाचं नांव सुचवितो. त्याच्या मुळे कसा फायदा झाला तो ते सांगतो. त्या बाबाकडे गेल्यावर ते काहीतरी उपासना करायला सांगतात. त्यामुळे आत्मविश्वास निर्माण होतो. मन घट्ट झालं की, आपोआपच पुढचं सगळं व्यवस्थित होतं. पण पुढे जाऊन आपलं काम सोडून त्याच्याच आहारी जाणं, दुसऱ्यांनाही त्याच मार्गावर चालण्याचा हट्ट करणे चुकीचं आहे. काही जणांना आपण कुणाचे तरी भक्त आहोत. एखाद्या मोठ्या बाबा-बुवा कडे जातो, हे प्रतिष्ठेचं लक्षण वाटतं. अर्थात अशी अनेक उदाहरणे देता येतील. पुण्या सारख्या सुसंस्कृत विद्येच्या माहेरघरात राहणाऱ्या उच्च पदस्थ लष्करी अधिकाऱ्यांना एका दुर्धर रोगानं पछाडलं त्याचे औषधोपचार सुरु असतांना त्यांना एका तरुणीने काही मंत्र-तंत्र सांगीतले. ते अधिकारी इतके आधीन झाले की, औषधोपचार सोडुन त्याच गोष्टीच्या मागे लागले. त्या तरुणीने मात्र त्यांना लाखो रुपयांचा गंडा घातला. शेवटी त्या अधिकाऱ्याचा आजार बळावला त्यात त्यांचं निधन झालं, हे कसलं जीव घेणं मंत्र तंत्र? अशा मंत्र तंत्र परंपरेच्या दडपणामुळे आणि भयावह श्रध्देमुळे अनेकांना त्या विधीचा त्याग करता येत नाही. पण जे लोक निर्भयपणे या रुढी परंपरा तोडतात ते उपरोक्त जोखडातून कायमचे मुक्त होतात त्यांना कोणतीही इजा होत नाही, वाईट ही घडत नाही. ही मानसिकता बदलून स्वतंत्र विचार करण्याची प्रवृत्ती वाढली पाहिजे, कारण परिवर्तन जगाचा शाश्वत नियम आहे. त्यामुळे विज्ञानवादी, तर्कनिष्ट बणण्याची गरज आहे.

हल्ली केवळ बाबांचा आर्शीवाद उपदेश नसतो. तर त्यांचं पेन, लॉकेट यांची ही आधर तयांना वाटतो. पुन्हा-पुन्हा सांगावसं वाटते. अंनिस श्रध्देला विरोध करत नाही पण अध्यात्मात ही प्रॉडक्ट कुठुन येतात? कुणीतरी बाबाची वही, पेन, मोबाईल मागे गाडी त्यांच्यात त्यांचे फोटो हे सगळं कशाला हवं? त्यांच्या नावाने तयार झालेले औषध, साबण, दंत मंजन, तेल, क्रिम, चुर्ण या सरसख्या पदार्थांची गरजच काय? अध्यात्मात हे मार्केटिंग कुठुण आलं? तसंच देवाचं नांव लिहुन वहया पूर्ण करणे, हा उद्योग कशा करीता? म्हणजे जेवढया वहया जास्तं, तेवढया नं वन चा भक्त, हे कुठलं मोजमाप? या देशात ३३ कोटी देव असतांना, हे देवाचे अवतार कशाला हवे? हे सर्व थोतांड वाटत नाही काय? अंधश्रध्दा रुजविण्याचे असले प्रकार थांबले पाहिजेत कारण जिथे अध्यात्म संपतं तिथे विज्ञान सुरु होतं.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## थकित वेतनासाठी 'पन्नगेश्वर'वर कर्मचाऱ्यांचे उपोषण

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२१, पानगाव :** रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील पन्नगेश्वर शुगर मिल्सच्या कर्मचाऱ्यांचे यकित वेतन न देता कारखान्याची विक्री व हस्तांतरण होणार असल्याने कारखान्याच्या मुख्य गेटवर १४ मेपासून साखळी उपोषण करण्यात येणार आहे. तसे निवेदन कामगार व कर्मचाऱ्यांच्या वतीने रेणापूरच्या पोलीस निरीक्षकांना देण्यात आले आहे.

मागील तीन वर्षांपासून पन्नगेश्वर कारखाना बंद आहे. या कारखान्याकडे मागील तीन वर्षांचा कर्मचाऱ्यांचा पगार, मॅच्यूईटी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पी.एफ.) येणे बाकी आहे. यामुळे कुटुंबियांची उपासमार होत आहे. वारंवार पन्नगेश्वर कारखान्याच्या मालक व

व्यवस्थापनाकडे मागणी केली, विनंती केली व उपोषणही केले. तरीही कोणीही दखल घेतली नाही. कर्मचाऱ्यांच्या मागणीकडे कारखाना व्यवस्थापन जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. कारखान्याचे ऑडिट दि. १४ मार्च २०२४ या कालावधीत नेमून दिलेल्या ऑडिटर यांच्या अधिकारात कारखान्याचे ऑडिट करून घेतले आहे. त्यात एकूण ५७८ कर्मचाऱ्यांची रक्कम १२ कोटी २ लाख ६३ हजार ४५८ थकित देय ऑडिट रिपोर्टप्रमाणे येणे असताना एजंटांनी काहींना अर्धवट रक्कम दिली. अन्य कर्मचाऱ्यांना दिली नाही.

हा कारखाना विमल ॲग्रो प्रा. लि. अंबाजोगाई यांनी विकत घेतला आहे. तरी त्यांनी

कर्मचाऱ्यांचे संपूर्ण देव हक्काची रक्कम मिळत नाही, तोपर्यंत कारखाना ताब्यात घेऊ नये, अशी मागणी कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी कर्मचारी दि. १४ पासून कारखान्याच्या प्रवेशद्वारावर साखळी उपोषणाला बसले आहेत. यात कोणाच्या जीविताला धोका झाल्यास त्याची जबाबदारी कारखाना व्यवस्थापनाची असेल, असा इशारा निवेदनाद्वारे पोलीस निरीक्षकांना देण्यात आला आहे. निवेदनावर सोमनाथ फुलारी, सुजित मुसने, सचिन फुले, तुकाराम खंगाडे, किशोर फठ, हेमंत हनवते, दिनकर केंद्रे, नवनाथ मुसने, सचिन हलकुडे, सत्यशीला वाघमारे, महेंद्र उकुंडे, नरसिंग गुडे, राजकुमार मुळे आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## चिकनचा कचरा, व्यवसायिकांचा राडारोडा अन् दुर्गंधी !



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२१, येरवडा :** येरवडा, कळस, धोनोरी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत असलेल्या अग्रेसन शाळा पाठीमागील रस्त्यावर कचरा व बांधकामाचा राडारोडा अनेक दिवसांपासून येथे जाणूनबुझून टाकला जातो . यामुळे भागात दुर्गंधी पसरल्याने वाहन चालकांना, धुळ, मती, कचऱ्याच्या दुर्गंधीचा नागरिकांना सामना कारवा लागतो.शालेय परिसर तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचे निवासस्थान असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकार्यांकडे तसेच संबंधित विभागाच्या आरोग्यनिरीक्षकांकडे तक्रार करूनही दखल घेतली जात नाही. संबंधित आरोग्य निरीक्षकाकडून तक्रारकडे दुर्लक्ष केले जाते .. अग्रेसन शाळा व कॉमरझोन आयटी पार्क कडे जाणारा मुख्य रस्ता या रस्त्यालगत जाणार्या रस्त्यावर परिसरातील नागरिक व चिकन दुकानाचे व्यावसायिक मोठ्या प्रमाणात चिकन कचरा आणून टाकत आहेत.

अनेक वेळा कचरा पेटविला जात असल्याचेही चित्र दिसून येत आहे.

कचर्याच्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांच्या वावर वाढला असून, ते दुचाकीस्वरांवर धावून जात आहेत. या कचर्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरल्याने वाहन चालक व स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

या भागातील बांधकाम व्यावसायिक खुलेआम या ठिकाणी रस्त्यावर राडारोडा आणून टाकत आहेत, व या ठिकाणी शासकीय कचरा असल्याचे चिन्ह दाखवून दिशाभूल करून रात्र- अपरात्री या ठिकाणी राडाराडा फेकला जातो .त्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी अरुंद झाला आहे. याबाबत वाहन चालकांनी स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा महापालिकेकडे तसेच संबंधित आरोग्य निरीक्षक यांना वारंवार तक्रार केली आहे. मात्र, प्रशासनाने अद्यापही हा कचरा व राडारोडा उचलला नसल्याचे दिसून येते.

संबंधित आरोग्य निरीक्षक व राडारोडा टाकणारे व्यवसायिकांसोबत हातमिळवणूक आहे का? असा संशय व्यक्त होत आहे. यामुळे प्रशासनाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त होत आहे. या ठिकाणी पडलेला कचरा व राडारोडा तातडी उचलण्याची मागणी वाहनचालकाकडून होत आहे.

## श्रीगोंद्यात भुजबळ समर्थकांचा फटाके फोडून जल्लोष



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. भुजबळ साहेबांना मंत्रिपद मिळताच श्रीगोंदा शहरातील समता परिषदेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंदोत्सवात जल्लोष केला. यावेळी पदाधिकार्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले.

याप्रसंगी पोलिस उपायुक्त कांतिलालजी कोथिंबिरे, अस्तित्व फाउंडेशचे अध्यक्ष गोरख आळेकर, नगरसेवक शहाजी खेतमाळीस, उपनगराध्यक्ष राजूदादा गोरे, सुधीर खेडकर, मुकुंद सोनटक्के, प्रशांत गोरे, नगरसेवक संतोष कोथिंबिरे, प्रशांत गोरे, चेअरमन बापूराव सिदनकर, महादू खेतमाळीस, किरण बनसुडे, महादू बोरुडे, सागर बोरुडे, दिलीप आळेकर, पोपट कोथिंबिरे, सुदाम कोथिंबिरे, लक्ष्मण कोथिंबिरे, शिवाजी राऊत, कांतिलाल कोकाटे आदी उपस्थित होते.

## हेवीवेट नेत्याच्या 'भुजां' ना मंत्रीपदाचे 'बळ'

**- अनंत बोरसे -**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मो.९१५८४९५०३७**



विधानसभा निवडणुकीनंतर फडणवीस सरकार स्थापन झाले तेव्हा मंत्रीपदी हेवीवेट छगन भुजबळ यांची वर्णी लागणार हे जवळपास निश्चित होते मात्र गेल्या काही वर्षांपासून अजितदादा पवार आणि छगन भुजबळ यांच्यात म्हणावे तितकेसे सख्य राहिले नाही परिणामी मंत्रीपदासाठी दादांनी नाशिक जिल्हातील माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ यांना संधी दिली,त्यामुळे छगन भुजबळ हे चांगलेच बिथरले आणि दादांवर घसरले. फडणवीस यांनी माझे नाव पाठवले होते, ते माझ्या साठी आग्रही होते मात्र मला संधी मिळाली नाही असा त्रागा त्यांनी केला होता. राष्ट्रवादी पक्षाने त्यांना सक्तीची निवृत्ती देत मार्गदर्शक मंडळात पाठवले का असे वाटत होते. लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यांना लोकसभा लढवा असे सांगून ऐनवेळी तिकिट नाकारले, नंतर विधानसभा लढवायला लावली आणि मंत्रीपदापासुन दुर ठेवले गेले. अजितदादा पवार आणि छगन भुजबळ यांच्यातील अबोला अनेकदा अधोरेखित झाला. अजितदादा नाशिक जिल्हा दौऱ्यावर आले कि छगन भुजबळ अनुपस्थित असे अनेकदा घडले. मध्यंतरी ओबीसींच्या निमित्ताने छगन भुजबळ याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी जवळिक वाढली होती आणि ते भाजपात जाणार अशाही चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र आपण राष्ट्रवादीतच रहाणार हे छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले. मात्र तरी देखील दोघांतील दुरावा जाणवत होताच. दोन दिवसांपूर्वी अजितदादा पवार हे नाशिक जिल्हा दौऱ्यावर होते ते कळवण येथे तर छगन भुजबळ हे येवला येथे असे चित्र होते मात्र दुसऱ्याच दिवशी छगन भुजबळ यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली आणि त्यांना पुर्वीचेच अन्न व पुरवठा खाते देखील मिळाले.

छगन भुजबळ हे कै. बाळासाहेब ठाकरे यांचे सहकारी त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी शिवसेना घडवली. ते शिवसेनेचे मुंबई चे पहिले महापौर तसेच पहिले आमदार बनले.१९९५ साली शिवसेना भाजप युतीची पहिल्यांदाच सत्ता आली तेव्हा त्यांचे देखील नाव चर्चेत होते मात्र मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. कालांतराने भुजबळांना पवार साहेबांनी बळ दिले आणि आपल्या कडे आणले, त्यांनी देखील भुजबळांना ऊपमुख्यमंत्री, मंत्री विरोधी पक्षनेते म्हणून संधी दिली.ओबीसीचा मोठा चेहरा म्हणून भुजबळांकडे पाहिले जाते महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून त्यांची देशभरात ओळख झाली आहे. भुजबळांना अनेक वर्षे सत्तापदाचा संधी मिळाली त्याच पुतण्या, मुलगा यांना देखील आमदार, खासदार पद मिळाले. दिल्लीतील महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी भाजपच्याच नेत्यांनी आरोप केले म्हणून यंत्रणांनी कारवाई करीत त्यांना अडीच वर्षे जेल मधे जावे लागले. मात्र ज्या फडणवीस यांनी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांनीच त्यांना आपल्या मंत्रीमंडळात सन्मानाने घेतले यालाच म्हणतात राजकारण.

भ्रष्टाचार मुक्त भारत व्हावा, भ्रष्टाचार सहन करणार नाही असे सगळेच म्हणतात मात्र भ्रष्टाचार प्रत्येक टप्प्यावर बोकाळला आहे आणि भ्रष्टाचाराच्या बाबतीत हमाम मे सब... आहेत. भ्रष्टाचाराबाबत भाजपची भूमिका तर अजबच आहे आमच्या बरोबर आलात तो भ्रष्टाचारी नाही आणि आमच्या बरोबर नसाला तर तो भ्रष्टाचारी देशद्रोही.सत्ता असल्यामुळेच भाजप जणु भ्रष्टाचाऱ्यांसाठी अभयदान देणारा पक्ष बनला आहे.

म्हणूनच भाजपमधे गेलो मला रात्री शांत झोप लागते असे खुद्द हर्षवर्धन पाटील यांनीच म्हटले होते. पंतप्रधान फक्त म्हणतात किसीको नही छोडुंगा, एक एक रुपया वसुल करुंगा मात्र प्रत्यक्षात घडते ते वेगळेच. निवडणूक रोखे योजनेच्या माध्यमातून करोडो रुपयांचे रोखे खरेदी करून विविध राजकीय पक्षांना दिले त्यात सर्वात मोठा लाभार्थी भाजप ठरला आणि कोणी किती रोखे खरेदी करून दिले हे ये पब्लिक है ये सब जानती है. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी ताठकणा दाखवला म्हणून त्यांच्यावर शंभर कोटी रुपयांच्या कथित वसुलीचा आरोप करुन जेलमधे टाकले गेले मात्र कालांतराने आरोप करणारा कमिशनरच खोटा ठरला आणि न्यायालयात आरोपपत्र दाखल होई पर्यंत शंभर कोटीचे एक कोटी झाले. खरंतर काँग्रेस वा ईतर पक्षाच्या कारभाराला कंटाळून मोठ्या अपेक्षेने जनतेने २०१४ साली सत्तांतर घडवले अनेक राज्यांत भाजपला सत्ता दिली वाटले होते देशात नवीन काही चांगले होईल.

मात्र कालचा गोंधळ बरा होता अशी म्हणण्याची पाळी जनतेवर आली आहे. भाजपला सत्ता पचविता आली नाही कि सत्तेचा सदुपयोग करता आला नाही.म्हणुनच अखेर ऊरले सुरलेले भ्रष्टाचारी आणि भाजपनेच जेलमध्ये पाठवलेले छगन भुजबळ यांना भाजपनेच पुन्हा सन्मानाने मंत्रीपदी बसवले आणि आपणच केलेले आरोप हा कसा थोंतांडपणा होता यावर शिक्कामोर्तबच केले. अजितदादा पवारांपासुन, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ यांच्यावर भाजपच्या ट्रोल आर्मीने आरोप केले आणि आता भाजपच्याच वॉशिंग मधुन त्यांचे डाग स्वच्छ केले जात आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भ्रष्टाचार मुक्त भारत च्या कितीही वल्गना करीत असले तरी भ्रष्टाचार मुक्त भारत व्हावा ही भाजप सहित कोणाचीच इच्छाशक्ती आणि मानसिकता नाही. भ्रष्टाचाराबाबत सगळ्यांचेच हात बरबटलेल आहे मात्र किमान भाजप सारखा चरित्र कि राजनिती चा तरी आव ईतर पक्ष आणत नाही हे जनतेच्या लक्षात आले आहे.मला मंत्रीपद, आमदार, खासदारकी मिळाली तरच जनतेचा विकास होऊ शकतो अशी प्रत्येक राजकारण्याची धारणा झाली आहे म्हणूनच सत्तापदे मिळवण्यासाठीच काहीही केले जाते. काही का असेना अखेर जेष्ठ हेवीवेट नेत्याच्या भुजांना मंत्रीपदाचे 'बळ' मिळाले.

## महानगर बँकेच्या उभारणीत शेळके पिता पुत्रांचे मोठे योगदान : अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२१, सुपा (अहिल्यानगर) :** जी एस महानगर बँकेच्या उभारणी पासून ते आतापर्यंत च्या वाटचालीत बँकेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत सॉलिसिटर गुलाबराव शेळके व ॲड . उदयराव शेळके यांचे मोठे योगदान असून ते कधी ही व कोणी ही नाकारू शकत नाही, या सर्व घडामोडींची मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून बँकेच्या निवडणूकी वरून शेळके कुटुंबात पडलेली फुट माझ्या दृष्टीने माझ्या ह्यातीतील सर्वात मोठी वेदनादायी बाब आहे, असे स्पष्ट प्रतिपादन व वेदना बँकेच्या विद्यमान अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी व्यक्त केल्या .

अध्यक्षा सुमनताई शेळके पुढे म्हणाल्या की, जी एस महानगर बँकेची स्थापना सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने केली, गेल्या ५० वर्षांमध्ये बँकेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे . बँकेच्या प्रगतीच्या प्रवासात माझे पती सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब आणि माझा मुलगा ॲड उदयराव शेळके यांची आहुती गेली, तरीही मी माझे सर्व दुःख बाजूला सारून समाजासाठी बँकेचे सभासद, ठेवीदार आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी ठामपणे उभे राहून बँकेची प्रगती साधली . आज आपली बँक भक्कमपणे पाय रोवून उभी आहे. तसेच गेले २ वर्षे मी आपल्या जीएस महानगर बँकेला सुदृढ बँकेचा दर्जा प्राप्त करून दिला आहे, हे सर्व केवळ दिवंगत गुलाबराव शेळके साहेब यांच्या प्रामाणिक विचारामुळे शक्य झाले आहे.

आज मी पुन्हा अजून एक अशा आव्हानाला सामोरे जात आहे. महानगर बँकेच्या सध्याच्या निवडणुकीत अत्यंत खालच्या स्तरावर घडामोडी घडल्या आहेत. घरातीलच काही सदस्यांनी बंड केल्यामुळे आणि काही संचालकांनी मला वचन दिले, तरीही त्यांनी माझ्याशी धोका केला, तसेच काही अतृप्त शक्तींनी या सर्व घडामोडींना खतपाणी घातल्यामुळे मागील ५० वर्षांमध्ये कधीही न पाहिलेले वाईट चित्र या निवडणुकीत दिसत आहे. ही निवडणूक खोटेपणाने माझ्या मुलीवर झालेल्या वैयक्तिक हल्लूयांनी संचालक मंडळातील फुटींमुळे शेळके परिवार कुटुंबाची सार्वजनिक फाटा फुट आणि प्रतिष्ठेचे संपूर्ण नुकसान झालेले आहे. ही फक्त निवडणूक नाही, तर आमच्या कुटुंबाची वेदनादायी फुट आहे. जी सार्वजनिक पणे उघड होत आहे.

मी आजपर्यंत बँकेच्या निवडणूक प्रचाराला सुरुवात केली नव्हती, कारण



माझी सदैव इच्छा होती की, ही निवडणूक बिनविरोधपणे पार पाडावी , शेळके विरुद्ध शेळके असा संघर्ष होऊ नये आणि बँकेची प्रतिष्ठा आबाधित राहावी, दुर्दैवाने सर्व प्रयत्न करूनही निवडणूक मात्र आमच्या नियंत्रणाबाहेर गेली, त्या परिस्थितीमुळे आम्हाला सामूहिक निर्णय घेण्यासाठी पुढील वेळ किंवा संधी मिळू शकली नाही. आमच्या काही उमेदवारांनी अगदी शेवटच्या क्षणी पाठ फिरवणे. हे माझ्या दृष्टीने पुर्णपणे अनपेक्षित होते. त्यामुळे आम्हाला योग्य वेळी औपचारिक प्रतिसाद देणे शक्य झाले नाही. आमच्या पॅनलचे उमेदवारां वर आता ही दबाव आणून फोडण्याचा प्रयत्न केला जात आहे ,अशी गोष्ट मी कधीच अपेक्षित धरली नव्हती. या गोष्टी ने मला खूप खोल वेदना झाल्या आहेत. परिणामी निवडणूक प्रक्रिया पुढे सरकले आहे, आमच्या पॅनलला निवडणूक चिन्ह रिक्षा मिळाले आहे. भावनिक दृष्ट्या मी हेही मान्य करते की, या निवडणूक लढाईत मला पूर्वीसारखा उत्साह टिकवणे, आता माझ्यासाठी कठीण झाले आहे आणि सध्याच्या परिस्थितीत सुरू असलेल्या अपप्रचारांनी मला अतिशय त्रास झाला आहे, तरीदेखील प्रक्रिया सुरू झाली आहे. मी आपल्या बँकेच्या सभासदांच्या विचार संपत्तीवर पूर्ण विश्वास ठेवून आपल्याला विनम्र आवाहन करते की, आपण लोकशाही प्रक्रियेचे पालन करून आपला मताधिकार बजावा आणि माझ्या नेतृत्वाखालील संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके पॅनलला मतदान करावे.

सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब यांच्या वारसाचा मान राखणाऱ्या या संस्थेचे भवितव्य जपण्यासाठी माझ्या पॅनलच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करावे, जी एस महानगर बँक परिवाराचे सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार, कर्मचारी आणि हितचिंतक यांचे प्रेम व पाठिंबा मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने मी त्यांचे मनःपूर्वक आभारी आहे, असे ही अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी सांगितले.

## खुशखबर ! ठाण्यात लवकरच मेट्रो धावणार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, ठाणे :** मुंबई पुणे आणी नागपूर पाठोपाट आता ठाणे शहरात देखील लवकरच मेट्रो धावणार आहे. वडाळा ते कासारवडवली मेट्रो ४ आणि कासारवडवली ते गायमुख मेट्रो ४ अ मार्गावर गाड्यांच्या चाचणी फेऱ्या सुरू होणार आहेत. त्यामुळं ठाणेकरांना लवकरच मेट्रोतून प्रवास करण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. काही दिवसांपूर्वीच मेट्रो ९ मार्गिकेवरील दहिसर ते काशीगाव मार्गिकेच्या चाचण्या पार पडल्या. त्यानंतर लकरच मेट्रो ४ मार्गावरीलही मेट्रो चाचण्या पार पडणार आहेत. वडाळा ते ठाणे-कासारवडवली मेट्रो ४ आणि कासारवडवली-गायमुख मेट्रो ४ अ मार्गिकेवरील कॅडबरी जंक्शन ते गायमुख दरम्यानच्या १०. ५ किमी मार्गिकेवरील चाचणीला ऑगस्टमध्ये सुरूवात होणार आहे. यशस्वीरित्या चाचण्या पार पडल्यानंतर ही मार्गिका डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. त्यामुळं लवकरच प्रवाशांचा मेट्रो प्रवास सुरू होणार आहे. मेट्रो ४ ही ३२.३२ किमी तर मेट्रो चार अ ही २. ७ किमी लांबीची मार्गिका आहे. या दोन्ही मार्गिकांवर मिळून ३२ स्थानकं असणार आहेत.दरम्यान हीं मेट्रो तीन टप्प्यात विभागली गेली आहे. वडाळा ते कासारवडवलीपर्यंतचा विस्तारित मार्ग जवळपास ८० टक्के पूर्ण झाला आहे. तर कासारवडवली ते कॅडबरी जंक्शन हा पहिला टप्पा डिसेंबर २०२५ पर्यंत सेवेत येण्याची शक्यता आहे. तर, २०२६ मध्ये कॅडबरी जंक्शन ते गांधीनगर हा भाग आणि २०२७ मध्ये वडाळा हा शेवटचा टप्पा सेवेत येण्याची शक्यता आहे. कासारवडवली ते गायमुखपर्यंतचा ४ अ मार्गाचा विस्तार ९० टक्के पूर्ण झाला असून यावर्षाच्या शेवटी तो सेवेत येण्याची शक्यता आहे.

**मेट्रो ४' आणि 'मेट्रो-४ अ' मार्गावरील स्थानकं पुढील प्रमाणे असणार आहेत**

१.. भक्तीपार्क मेट्रो, २. वडाळाटीटी, ३.. अनिकनगरबसडेपो, ४.. सिद्धार्थकॉलनी, ५. गरोडियानगर, ६. पंतनगर, ७. लक्ष्मीनगर, ८. श्रेयससिनेमा, ९. गोदरेजकंपनी, १०. विक्रोळीमेट्रो, ११. सूर्यानगर, १२. गांधीनगर, १३. नेव्हलहाऊसिंग, १४. भांडुपमहापालिका, १५. भांडुपमेट्रो, १६. शांग्रीला, १७. सोनापूर, १८. फायरस्टेशन, १९. मुलुंडनाका, २०. ठाणे तीनहात नाका, २१. आरटीओ ठाणे, २२. महापालिकामार्ग, २३. कॅडबरी जंक्शन, २४. माजिवडा, २५. कापूरबावडी, २६. मानपाडा, २७. टिकूजी-नि-वाडी, २८. डोंगरीपाडा, २९. विजयगार्डन, ३०. कासारवडवली

# वैद्यकीय महाविद्यालय नगर शहरातच होणार अन्यथा संघर्ष - खा.लंके

## खासदार निलेश लंके यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** केंद्र सरकारने नुकतेच मंजूर केलेले वैद्यकीय महाविद्यालय नगर शहरातच व्हावे, यासाठी महाविकास आघाडीचे खासदार निलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. नगर शहर उपेक्षित राहू नये. यासाठी वैद्यकीय महाविद्यालय शिर्डी येथे हलवले गेले तर आपण उपोषणास बसू, असा थेट इशाराच त्यांनी दिला आहे. आज नगरमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत लंके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नगर शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय असून येथे वैद्यकीय शिक्षण व उपचारासाठीची संपूर्ण पायाभूत सुविधा आहे.

जिल्हा रुग्णालय, दळणवळणाची सुलभता आणि केंद्रस्थानी असलेले स्थान यामुळे वैद्यकीय महाविद्यालय येथेच व्हायला हवे.

यावेळी युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड, नगरसेवक योगीराज गाडे, प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. शिर्डीला विरोध, विखेंना सूचक टोला लंके यांनी शिर्डी येथे मेडिकल कॉलेज व्हावे यासाठी सुरू असलेल्या हालचालींवर नाराजी व्यक्त करत, सत्तेचा गैरवापर करून प्रकल्प दुसऱ्या तालुक्यात वळवण्याचा प्रयत्न चालू असल्याचा गंभीर आरोप केला. त्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे नाव न घेता, सूचक इशारा देत म्हटले की, हे प्रकल्प स्थानिक जनतेच्या गरजांनुसार असले पाहिजेत, व्यक्तिगत स्वार्थासाठी नव्हे. नगर शहरातील उपलब्ध जागांची माहिती, नगर शहरालगत असलेल्या विविध शासकीय जागांचा उल्लेख करत लंके म्हणाले, इंद्रायणी हॉटेलच्या शेजारी सुमारे २५ एकर, विळद येथे कृषी विभागाची ४० एकर जागा तसेच आरणगाव येथील माजी टीबी सेंटरची जागा अशा अनेक जागा या प्रकल्पासाठी उपयुक्त ठरू शकतात. या सर्व जागांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे ही त्यांनी स्पष्ट केले.



### जिल्हा विभाजनाची गरज अधोरेखित

अहमदनगर जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या अत्यंत मोठा असल्याने प्रशासकीय नियोजनासाठी जिल्ह्याचे विभाजन झाल्यास प्रशासन अधिक प्रभावी होईल, असेही त्यांनी नमूद केले. ढवळपूरी येथील शेळी- मेंढी पालन प्रकल्प देखील उत्तर भागात हलवण्याचे प्रकार अलिकडे घडला आहे. तो ही अन्यायकारक असल्याचे लंके यांनी सांगितले. याबाबत देखील आपण आवाज उठवणार आहोत. असे ठाम वक्तव्य त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांना पत्र, केंद्रीय समितीला प्रस्ताव नगरमध्ये वैद्यकीय महाविद्यालय व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले जाणार असून, केंद्र सरकारच्या समितीला सुद्धा योग्य प्रस्ताव सादर केला जाईल, असे लंके यांनी स्पष्ट केले. खासदार निलेश लंके यांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भात घेतलेली ही आक्रमक भूमिका, नगर शहराच्या विकासासाठी एक निर्णायक पाऊल ठरु शकते.

# खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राच्या दिक्षाची सुवर्णसकाळ

## सागरी जलतरणात १ सुवर्णासह २ कांस्य

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, दीव :** भल्या पहाटे रंगलेल्या पहिल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेतील सागरी जलतरणात दिक्षा यादवच्या कामगिरीमुळे महाराष्ट्राने स्पर्धेतील सुवर्ण सकाळ अनुभवली. १० मीटर स्विमथॉन प्रकारात महाराष्ट्राने दिक्षाच्या सुवर्णपदकासह २ कांस्यपदकांची कमाई केली. बीच पेंचक सिलटमध्ये देखील महाराष्ट्राने स्पर्धेतील पहिले सुवर्णयश संपादले. २ सुवर्णांसह ९ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्र पदकतक्यात तिसऱ्या स्थानावर आहे. दीवच्या अरबी समुद्रात पहाटे ६ वाजता १० मीटर स्विमथॉनचा थरार रंगला. महिलांच्या गटात सुरूवाती पासून महाराष्ट्राच्या १९ वर्षीय दिक्षा यादवे मुसंडी मारली होती.

२ मिनिटे १८.०९ सेकंद वेळेत शर्यतीचा पल्ला पार करीत दिक्षाने सुवर्णपदक पटकावले. रौप्य व कांस्य पदकांसाठी अनुक्रमे महाराष्ट्राच्या पूर्वा गावडे व तामिळनाडूच्या एम.आरना यांच्यात शर्यत रंगली. दोघींनी ही एकाच वेळी अंतिम रेष पार केली. अवघ्या १४ दशांश सेकंदाने पूर्वाला रूपेरी यशाने हुलकावणी दिली. २.१८.३८ वेळ देत आरनाने रौप्य, तर २.१८.५२ वेळ नोंदवून पूर्वाने कांस्यपदक जिंकले.





साताऱ्यातील दिक्षा आणि सिंधूदुर्गच्या पूर्वा या दोन्ही खेळाडू पुण्यातील शासनाच्या क्रीडा प्रबोधिनीत सराव करतात. ५० मीटर फ्रीस्टाईल खेलो इंडिया विद्यीपीठ स्पर्धेत ही दिक्षाने पदक जिंकले आहे. मुलांच्या स्विमथॉन प्रकारात ही महाराष्ट्रचे जलतरणपटू चकमले. चैतन्य शिंदेने २.१३.१४ वेळ देत कांस्यपदकाचे यश संपादन केले. कर्नाटकच्या रेणुकाचार्या होदमानीने सुवर्ण, तर पश्चिम बंगालच्या पृथ्वी भट्टाचार्याने रौप्यपदक कमवले. महाराष्ट्रातील विजेत्यांची भेट घेत पथकप्रमुख नवनाथ फडतरे, क्रीडा अधिकारी अरुण पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या पारंपारिक पेंचक सिलट प्रकारात महाराष्ट्राच्या रिया चव्हाण व प्राजक्ता जाधव या जोडीने सुवर्णपदकाला गवसणी घातली, या पदकाने महाराष्ट्राचे सुवर्णपदकाचे खाते उघडले. ५५५ गुणांची कमाई करीत रिया-प्रातक्ता जोडीने गंडा प्रकारात सर्वोत्तम कामगिरीचे प्रदर्शन घडवले. मणिपूरने ५५२ गुणांसह रौप्य, तर कर्नाटकने ५४२ गुणांसह कांस्यपदकांवर नाव कोरले. एकेरीत महाराष्ट्राच्या किर्णाक्षी येवलेने कांस्यपदकाची कमाई केली आहे.

बीच सेपक टकरा स्पर्धेतील दुसऱ्या लढतीत महाराष्ट्राला विजय गवसला.महाराष्ट्राने राज्यस्थानला २-० असे सरळ सेटमध्ये पराभूत करून स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखले. कबड्डी मैदानात ही महाराष्ट्राचा जयजयकार घुमला. महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी यजमान दीम दमणला पराभूत केले. महिला संघाने दीव संघाचा ८०-११ गुणांनी धुव्वा उडविला, तर पुरूष संघाने दीव संघावर ७३-३६ गुणांनी दणदणीत विजय संपादन केला. स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी २ सुवर्ण, २ रौप्य आणि ५ कांस्य पदके जिंकून महाराष्ट्र पदकतक्यात तिसऱ्या स्थानावर आहे. यजमान दीव-दमण ३ सुवर्णांसह एकूण ४ पदकांसह अव्वल स्थानी आहे.

# शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुलात विद्यार्थी, शिक्षकांचा गुणगौरव सोहळा

**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.२१, उरण (रायगड) :** ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था संचालित रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स या कनिष्ठ महाविद्यालयाचा फेब्रुवारी २०२५ चा १२ वी परीक्षेचा कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखांचा निकाल १०० टक्के लागल्यामुळे परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव समारंभ संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहाने संपन्न करण्यात आला.

यात कला शाखेत संस्कृती धनंजय वर्तक ७६ टक्के तर विज्ञान शाखेत गौरव साईनाथ गावंड ७३.५० टक्के व वाणिज्य शाखेत मितेश मारुती म्हात्रे ६७.५० टक्के गुण प्राप्त करून यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. यावेळी तिन्ही शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य व ज्येष्ठ साहित्यिक



ए.डी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात यश प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावेत आणी आई-वडील व गुरुजनांचा आदर करणे व सुसंस्कारीत जीवन जगण्याचा कानमंत्र दिला,

तसेच सेवानिवृत्त सहाय्यक शिक्षक निरीक्षक प्रकाश पाटील यांनी आत्मविश्वास, शिस्त व त्याग याचे जीवनातील महत्त्व विशद करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश उपस्थिताना दिला. याप्रसंगी संस्थेच्या खजिनदार प्राचार्य डॉ.सुखदा म्हात्रे यांनी जीवनात ध्येय संपादन करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असा संदेश देऊन विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण प्राप्त करावे व स्वतः बरोबर समाजाचा गौरव वाढवावा असे प्रतिपादन केले.

संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांनी अध्यक्षीय भाषणात बारावी परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून इयत्ता बारावी नंतर कोणत्या सेवा संधी आहेत. त्या संदर्भात अभ्यासक्रम कोणते आहेत याची माहिती दिली.

ज्ञान प्रसार शिक्षण संस्थेने उरण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठीय उच्च शिक्षण सोयीचे व्हावे. यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुरू केलेल्या शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स या महाविद्यालयातील कला, विज्ञान, वाणिज्य, तंत्रज्ञान या शाखांतील अभ्यासक्रमाची माहिती विशद केली.

तसेच मुंबई विद्यापीठाची पदवी प्रक्रिया व नियमावली याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षण, कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात शिक्षण करिता प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे आर्टस सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयामध्ये केलेल्या कार्याचा गौरव केला. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत प्रथम व द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमासंबंधी मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेच्या विश्वस्त मेघा म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुविद्य गावंड, सुयश म्हात्रे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी पाहुण्यांचा परिचय व स्वागत केले.

शिवहरी गावंड यांनी सूत्रसंचालन केले व विलास काटे यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक वृंद उपस्थित होते.

# थोडक्यात

## कल्याणमधील इमारतीचा स्लॅब कोसळल्याने ६ जखमी तर ६ जणांचा मृत्यू

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, ठाणे :** कल्याण शहरातील कल्याण (पूर्व) चिकणीपाडा येथील सप्तशृंगी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी या पाच मजली निवासी इमारतीमधील चौथ्या मजल्यावर फरशी बसविण्याचे काम सुरू होते. हे काम सुरू असताना चौथ्या मजल्याचा स्लॅब खाली कोसळला आणि ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एकूण ६ व्यक्ती जखमी झाल्या असून ६ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती तहसिलदार सचिन शेजाळ यांनी दिली आहे. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, कल्याण यांनी दिलेल्या अहवाला नुसार, ही घटना दिनांक २० मे २०२५ रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. ही दुर्घटना घडल्यानंतर जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अशोक शिनगारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक प्रशासनाने तात्काळ मदत व बचाव कार्य सुरू केले. त्याचबरोबर घटनेनंतर प्रशासनाकडून तातडीने पंचनामा करण्यात आला असून, जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत.घटनास्थळावरील शोध कार्य पूर्ण झाले असून इमारतीतील नागरिकांना जवळील ज्ञानमंदिर विद्यालय, कल्याण (पूर्व) येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे त्या सर्वांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.या घटनेची माहिती मिळाल्याबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेतील मृत सहा नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबियांच्या दुः खात सहभागी असल्याचे सांगितले. तसेच मृतांच्या कुटुंबियांना शासनातर्फे ५ लाखांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

## आपत्तीचा सामना करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज राहावे - जिल्हाधिकारी यांचे शासकीय यंत्रणांना निर्देश




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** मान्सून कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज राहावे. संभाव्य आपत्तीच्या काळात सर्व विभागाचे अधिकारी समन्वयाने कार्य करत, कोणीही पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी डॉ.आशिया बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागोराव चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.वीरेंद्र बडदे, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील हे प्रत्यक्ष उपस्थित होते; तर शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व संबंधित यंत्रणांचे अधिकारी दूर दृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.आशिया म्हणाले, जिल्ह्यात मान्सून कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सर्वोतोपरी सज्ज राहावे. पूर परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी सुरक्षित निवाऱ्यांची पाहणी करून त्याचे सूक्ष्म नियोजन करावे. त्या ठिकाणी अन्नधान्य, पाणी, औषधे आदिंची पुरेशी व्यवस्था असावी. जिल्ह्यातील विविध पाणी साठवण प्रकल्प, साठवण तलाव, पाझर तलाव यांची पहाणी करून ते सुस्थितीत असल्याची खात्री करावी. आपत्ती काळात विद्युत पुरवठा व दूरध्वनी सेवा अखंडित सुरू राहील, यासाठी संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. पूरप्रवण व तलाव क्षेत्रामध्ये गाव शोध व बचाव पथकांची व्यवस्था चोख ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

## नवी मुंबईतील गायक-वादकांनी केली देहू-आळंदी यात्रा संपन्न



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२१, ठाणे (नवी मुंबई) :** नवी मुंबईतील वारकरी दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला आळंदी पायी यात्रा करत असतात. या वारीत सहभागी असणाऱ्या संगीत गायक-वादकांनी यंदा प्रथमच वैशाख महिन्यात नवी मुंबई ते देहू-आळंदी अशी यात्रा आयोजित केली होती. यात कळवा ते दिवाळे गावापर्यंतचे गायक, वादक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नवी मुंबई विभागातील कळवा-दिवाळे येथील मागील २५ वर्षे सातत्याने आळंदी-पंढरपूर यात्रा करणाऱ्या सर्व गायक, वादकांनी यंदा प्रथमच १५ मे रोजी देहू-आळंदी या यात्रेचे आयोजन केले होते. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, कुकशेत येथील माजी नगरसेवक सुरज बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत या यात्रेला प्रारंभ करण्यात आला. त्यांनी प्रथम श्री क्षेत्र महड येथे जाऊन गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर पुढे देहू येथील मंदिरात सर्व गायक व वादकांना येथील विश्वस्त मंडळाच्या वतीने संत तुकाराम महाराज मंदिरात भजन करण्याची संधी दिली. त्यानंतर देवाची आळंदी येथे दर्शन घेऊन यात्रा नवी मुंबईत दाखल होताच यात्रेची सांगता करण्यात आली. यावेळी अशोकबुवा म्हात्रे, गणपतबुवा भोपी, रामबुवा पाटील (नवी मुंबई भूषण) यांनी गिरीश कान्हा म्हात्रे (मा. नगरसेवक), अक्षय गजानन पाटील, देवनाथ काशिकृष्णा म्हात्रे, जयंत काशिनाथ म्हात्रे, हरेश्वर मधुकर भोईर यांनी या यात्रेस मोलाचे सहकार्य केल्याचे सांगण्यात आले.